प्रकरण - चौथे

# ‘वाटा-पळवाटा’ नाटक
# व
# ‘भाकरी आणि फूल’ या कादंबरीतील
# संघर्षः साम्य आणि भेद

# प्रकरण - चौथे

# 'वाटा-पळवाटा' नाटक व 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील संघर्ष : साम्य आणि भेद

## ❖ प्रास्ताविक :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात उदयास आलेल्या साहित्य प्रवाहाच्या प्रेरणास्थानी विशेषत: महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत. त्यामुळे साहित्य प्रवाह वेगळा असला तर त्या प्रवाहांना प्राप्त झालेली वैचारिक बैठक सामाजिक न्यायाची, समता, स्वातंत्र्य, बंधुता या मानवी मूल्यांची आहे. या मूल्यांची रूजवण करण्यासाठी कृतीप्रवण संघर्ष येतो. परिणामी, हे मानवतावादी बऱ्याच साहित्यकृतीचे आशयसूत्रे समान आलेली आहेत. अशा भिन्न वाङ्मय प्रकारातील समान आशयसूत्र असणाऱ्या 'वाटा-पळवाटा' (नाटक) व 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) यातील संघर्षातील साम्य व भेदावरती दृष्टिक्षेप या प्रकरणामध्ये टाकावयाचा आहे.

दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' नाटक व मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' कादंबरी या दोन्ही कलाकृतीमधील दलित जीवन चित्रणाचा विचार आपण येथे करत आहोत या दोन्हीतील आशय साम्य-भेद तसेच व्यक्तिरेखांतील साम्य-भेद पाहिल्यानंतर दोन्ही कलाकृतीतील आशयसूत्र व व्यक्तिरेखांमध्ये बऱ्याच प्रमाणात साम्य दिसून येते. हे आपण यापूर्वी विस्ताराने पाहिले आहे. आशयसूत्र आणि व्यक्तिरेखांमध्ये साधर्म्य असलेल्या साहित्यकृतींच्या मध्ये असणारा 'संघर्ष' कोणत्या प्रकारचा असतो व त्यामध्ये येणाऱ्या साम्य-भेदाच्या पाठीमागची कारणे यांचा येथे सविस्तर परामर्श घ्यावयाचा आहे. संघर्ष आणि दलित साहित्य यांचे अतूट असे नाते आहे. दलित समाजाच्या प्राचीन कालापासूनच्या वाटचालीचा विचार करता; या समाजाचे एकूण जीवनच संघर्षमय आहे. मराठीतील ज्येष्ठ समीक्षक, विचारवंत व अस्मितादर्श या वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे या संदर्भात म्हणतात की, "सामाजिक व सांस्कृतिक हुकुमशाहीचा बिमोड करण्यासाठी तर बुद्ध विचार केंव्हाच उदयाला आला होता.

याचा अर्थ प्रबोधनाची प्रक्रिया या देशात जितकी महत्त्वाची आहे. तितकीच प्राचिनता टिकवून ठेवण्याचा निर्धारही महत्त्वाचा आहे. हा संघर्ष दोन हजार वर्षे तरी सुरू आहे."[१]

भारतीय समाज जीवन विषमताग्रस्त आहे. श्रेष्ठ-कनिष्ठ आणि उच्च-नीच स्तर ही मानसिकता इथे महत्त्वाची मानली जाते. उच्च जातींचा असले तर उच्च स्थान टिकविण्यासाठीचा तर नीच ठरवलेल्या जातींचा स्व-अस्तित्वासाठीचा संघर्ष प्राचीन काळापासून क्रियाशील आहे. बुद्धाचा मानवतावाद ही दरी कमी करण्याचा प्रयत्न करते, मात्र हे मानव्य परंपरावाद्यांना मान्य नसल्याने हा संघर्ष अधिक गतिमान होत गेला. दलित साहित्य आंबेडकर प्रणित बुद्ध तत्त्वज्ञानाचा आग्रह धरतो. म्हणून या संघर्षाची प्रदीर्घ परंपरा विचारात घेऊन या परंपरेच्या अनुषंगानेच 'वाटा-पळवाटा' व 'भाकरी आणि फूल' या साहित्यकृतीतील संघर्षाच्या साम्य-भेदांचा विचार करता येईल. कारण दोन्ही कलाकृतीमध्ये आलेले दलित जीवन चित्रणाचे वास्तव व मानवमूक्तीसाठी उभी केलेली चळवळ हेच आशयसूत्र आहे. या संघर्षालाच दलित साहित्यात 'विद्रोह' हे संबोधन योजिले आहे.

दलित साहित्यातील संघर्ष, विधायक स्वरूपाचा आहे या संघर्षाच्या पाठीमागे एक तत्त्वज्ञान व व्यापक विचाराची बैठक आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या शिकवणीची कृतीप्रवणता यात आहे. ह्या कृतीप्रवणतेचा परिणाम प्रत्यक्ष सामाजिक जीवनावर होतो. म्हणूनच या संदर्भात डॉ. कृष्णा किरवले म्हणतात की, "दलित समाजाला संघर्षमय बनवण्यामध्ये दलित साहित्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. परंतु हा संघर्ष विध्वंसक नसून तो रचनात्मक आहे. रक्त किंवा हिंसात्मकता या संघर्षात दिसत नाही. विचाराने विचाराशी केलेला संघर्ष या साहित्यातून दिसून येतो. त्याच्या अंतरंगात बुद्धाची मानवता, आंबेडकरी अस्मिता आणि संविधानातील मूल्यात्मकता केंद्रीत आहे. जगा आणि जगू द्या या लोकशाही तत्त्वांवर त्यांचा विश्वास आहे. त्यामुळे दलित साहित्यातील संघर्ष हा तलवारीऐवजी लेखणीवर विश्वास ठेवतो."[२] 'वाटा-पळवाटा' व 'भाकरी आणि फूल' या दोन्ही कलाकृतीमध्ये संघर्षाच्या केंद्रस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे ह्या साहित्यकृती सामाजिक जीवनाची रचनात्मक मांडणी करतात.

सामाजिक, सांस्कृतिक जगात प्रत्येक काळात क्रांती-प्रतिक्रांती स्वरूपाचे संघर्ष अटळपणे सुरूच असतात. हें न संपणारे संघर्ष असतात वर्तमानातले काही संघर्ष हे इतिहासातील संघर्षाची अनुकृती वाटावी अशा प्रकारचे असतात. म्हणून एखाद्या कलाकृतीतून ऐतिहासिक, सांस्कृतिक पातळीवरचे संघर्ष हे वर्तमानकाळी संघर्षाचे सूचन करताना दिसतात. 'वाटा-पळवाटा' (नाटक) आणि 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) या दोन्ही कलाकृतीत सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक अशा आशयासह प्रकट होतात. एकूणच दलित साहित्यातील संघर्ष हा वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रकट होतो. तो कधी आपल्या समाजांतर्गत असतो तर कधी अस्पृश्य समाजावर पिढ्यानपिढ्या अन्याय-अत्याचार करणाऱ्या समाजाविरूद्ध संघर्ष केला जातो. तर हाच संघर्ष कधी वैचारिक स्वरूपाचा असतो. अस्पृश्य समाजाला त्याचे न्याय, हक्क मिळवून देण्यासाठी असतो. विविध प्रवृत्तींच्या व्यक्तिंच्या माध्यमातून हा संघर्ष साकार झालेला असतो. त्यात जाती श्रेष्ठत्त्व-कनिष्ठत्व, ब्राह्मण्यपुराणमतवाद, लाचारी इ. प्रवृत्तींचा झघडणारा संघर्ष आहे. या सर्व संघर्षाच्या पाठीमागे फुल-आंबेडकरी विचाराच्या जाणिवा आहेत. दत्ता भगत 'वाटा-पळवाटा' (नाटक) व मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) यातील संघर्षाचे स्वरूप पाहिल्यानंतर त्याच्या साम्य-भेदावर दृष्टिक्षेप टाकता येईल.

### ❖ 'वाटा-पळवाटा' नाटकातील संघर्ष :

दलित नाटक प्रस्थापित नाटकापेक्षा वेगळे आहे. या नाटकातील जीवनानुभव दलितांच्या उपेक्षित अनुभवाशी निगडित आहेत. त्यामुळे या नाटकांने मराठी तमाशा, सत्यशोधक व आंबेडकरी जलसाच्या सादरीकरणारांचा बाज स्वीकारला आहे. पण दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' नाटकाने मराठी नाटकाचाच पारंपरिक आकृतिबंध स्वीकारला आहे. या नाटकातील संघर्षाचा विचार करताना दत्ता भगत यांचा प्रत्यक्ष असणारा आंबेडकर चळवळीचा संबंध त्यांना 'कार्यकर्ता' म्हणून आलेला अनुभव, स्वातंत्र्याच्या काही वर्षातच झालेली चळवळीची पडझड या सर्व गोष्टी त्यांनी पाहिलेल्या आहेत. त्यांचा असणारा नाट्यलेखन तंत्राचा अभ्यास, सूक्ष्म निरीक्षण या पार्श्वभूमीवर. 'वाटा-पळवाटा' या नाटकातील संघर्षाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

दत्ता भगत यांनी. 'वाटा-पळवाटा' या नाटकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावलेल्या तीन पिढ्या व त्यांच्याशी संबंधीत असलेले दलित राजकारण आणि समाजकारण या विषयीच्या चळवळी व त्या अनुषंगाने या तीन पिढ्यांमधील वैचारिक संघर्ष या नाटकामध्ये मांडलेला आहे. 'संघर्ष' हा या नाटकाचा महत्त्वाचा घटक आहे. व या संघर्षाच्या केंद्रस्थानी चळवळ आणि जातीयता हे दोन घटक आहेत. चुकीच्या मार्गामुळे आणि र्मादर्शनाच्या अभावी चळवळीची कशी पडझड होते याचे चित्रण या संघर्षतून उभे राहते.

'वाटा-पळवाटा' या नाटकातील संघर्ष हा वैचारिक, तत्त्वनिष्ठ स्वरूपाचा आहे. या नाटकातील काका आंबेडकरी चळवळीत प्रत्यक्ष काम केलेले आहेत. ते जुन्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. प्राध्यापक सतीश हा स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेला शिकलेला, नोकरित स्थिर झालेला, चळवळीशी संबंधीत असलेला, प्रत्येक प्रसंगाचा गांभीर्याने विचार करणारा आहे. अर्जुन हा महाविद्यालयीन विद्यार्थी आहे. आपल्या ध्येयाजवळ तडक जाणारा परिणामांची चिंता न करणारा, तत्त्वनिष्ठेला जास्त महत्त्व न देणारा अशा तीन पिढ्यांतील संघर्ष या नाटकात येतो. 'संघर्ष' हा नाटकाचा आत्मा आसतो. त्यामुळे दत्ता भगतांच्या या नाटकात संघर्ष दिसून येतो. हा संघर्ष वेगवेगळ्या पातळ्यांवरून साकार होतो. व संघर्ष सामाजिकता, व्यक्तिगत आणि मानसिक पातळ्यापर्यंत निर्माण करून दत्ता भगत नाटकाच्या आशयाची (कथानकाची) परिणामकारकता वाढवतात.

संघर्ष म्हणजे दोन विरोधी व्यक्तित्त्वातील द्वंद्व होय, त्यात व्यक्ति-विरूद्ध व्यक्ती, व्यक्ति विरूद्ध परिस्थिती किंवा एकाच व्यक्तीच्या अंतरमनातील दोन विरोधी प्रवृत्ती यातूनच हा संघर्ष परिणामकारक होण्यासाठी दत्ता भगत आंबेडकरकालीन एक आणि आंबेडकरोत्तर दोन पिढ्या या तीन पिढ्यातील अंतर्विरोधाचे चित्र उभे करतात; सतीशकडे नेतृत्त्व देण्याची क्षमता असूनही तो आंबेडकरी विचारकृतीचा वाहक ठरू शकत नाही. प्राप्त परिस्थिती, आंबेडकरांनी घेतलेल्या निर्णयाची तो फक्त विचार करू शकतो. त्याच्याकडे कृतिप्रवणता नाही. वर्तमानाच्या संदर्भात सतीशने चळवळ उभी करणे अगत्याचे होते पण तसे नाटकात घडत नाही. सतीशच्या निमित्ताने दत्ता भगत दलित मध्यमवर्गाची झालेली निष्क्रियता स्पष्ट करतात. मात्र एवढेच स्पष्ट करणे हा या नाटकाचा हेतू नाही. अवती-

भोवतीच्या सामाजिक पर्यावरणात बुद्धिवंताची झालेली आगतिक अवस्था याचेही दर्शन नाटककाराने घडविले आहे. या रूपाने सतीशच्या अंतरमनातील संघर्षाचे दर्शन घडते. एक प्रकारे शिक्षित बुद्धिवंताची कोंडी होते. वरचा वर्ग, सवर्णाचा वर्ग त्याला स्वीकारत नाही. आणि दलितांना आपला वाटत नाही. अशा मानसिक द्वंद्वात तो आहे.

प्रसंगी सारेच सवर्ण 'जात' महत्त्वाची मानतात. जातीला जात मिळते सारे सवर्ण एक होतात. आणि सतीशला जातीयवादी ठरवून त्याचा निषेध करतात. या घटनेने सतीश आतून खालेला आहे. म्हणून अर्जुन सारख्या बंडखोर अंकुराला जोपासण्याची अपरिहार्यता त्याच्या लक्षात येते. सतीशला भौतिक सुरक्षितता असली तरी सामाजिक सुरक्षितता नाही. केवळ विचारांवर माणसाला जगता येत नाही हे विचार सतीशला पटवून देऊन त्याची पत्नी हेमा त्याला संघर्ष सन्मुख करते. 'वाटा-पळवाटा' मधील नाटकाच्या मूळाशी चळवळ आणि जातीयता यातील संघर्ष महत्त्वाचा आहे. काकांच्या पिढीतील चळवळ सतीशच्या पिढीत स्थिरावल्या सारखी वाटते. तर अर्जुनच्या पिढीत ती उद्रेक स्वरूप धारण करते. अर्जुन हा नेतृत्त्व करणारा आहे. अर्जुन तसा बंडखोर आहे. तो चळवळीसाठी वैयक्तिक जीवनाचा त्याग करतो. पण त्याचवेळी पुरेशा मार्गदर्शनाच्या अभावी तो राजकीय खेळातील बाहुले बनू लागतो. मिलिंदनगर मधील वसाहत जाळणारे सवर्ण निर्दोष सुटतात व पुन्हा त्यांना निर्दोष सोडणारा हेमाचा वडील असतो. त्यामुळे संघर्ष वाढतो. याच दंगलीत शेवंताचा बळी पडतो. याच संघर्षामधून काकांचा मृत्यू झाल्यासारखे वाटते. रूपवते, भंडारे, दादासाहेबासारखा अर्जुनही निघाला. याचे मनस्वी दु:ख काकांना होते व ते न सहन झाल्यामुळेच त्यांचा अंत होतो. यातून फलित काहीच नाही चळवळ मोडकळीस येते. तिला राजकीय स्वरूप येऊ लागते व पुढारी मंडळी तिच्या सोयीनुसार उपयोग करू लागतात. यातील खरा संघर्ष सतीशच्या स्वत:च्या जगण्यातील आहे. त्याचा स्वत:चा स्वत:शी संघर्ष चालू आहे. त्याला चळवळीत धड भागही घेता येत नाही आणि दूर ही राहता येत नाही. शेवटी दलितांनी कितीही संघर्ष केला तरी त्यांना जगणे हे सुद्धा फार महत्त्वाचे वाटते. पोटासाठी ते लाचार बनताना दिसतात. आपली अस्मिता जागी ठेवून संघर्ष करणारे दलित प्रसंगी तडजोड करताना दिसतात.

सतीशची द्विधा मन:स्थिती व त्यातून स्वत:शी चाललेला संघर्ष येथे उभा राहतो. तो कॉलेज मधून अर्जुनला काढू देत नाही. पण त्याचवेळी अर्जुनला चुकीच्या दिशेने चालला आहे हे सांगण्याचेही तो विसरत नाही. त्याची ही व्यथा हेमाशी बोलताना व्यक्त होते. त्याला माणूसकी संपत चालल्याचे मनस्वी दु:ख आहे. म्हणूनच त्याच्या मनात शंका येते की, हेमा बुद्ध-मूर्तीची पूजा बळेच तर करत नसावी ना याचा प्रत्यक्ष अनुभव त्याच्या पुढील संवादातून येतो. "म्हणूनच तर उदास झालोय परिस्थितीला आवर घालणारे राजकारणी संपले आता परिस्थितीवर स्वार होतो तो नेता ठरतोय. आज प्रलोभनाची खिरापत वाटतो त्याच्या मागं जातात लोक तुला काय वाटत? आज अर्जुनच्या पाठीशी उभे असणारे दलित उदया त्याच्या पाठीशी उभे राहतील? अर्जुननं घरं मिळवून दिली त्यांना विनासायास उदया अर्जुनपेक्षा मोठं प्रलोभन देऊ करणारा कुणी पुढं आला की, लोक ह्याला फेकून देतील. अर्जुनच स्थान काय ठरेल माहितीय! एखाद्या बड्या दादाचं बाहुलं होईल. आणि दलितांच्या संघटनेच्या होतील चिंध्या. प्रलोभनाच्या मोहक शस्त्रानं उठवलेल्या."[३] एकूणच चळवळ आणि तिची पडझड आणि त्यामधून उध्वस्त होणारे संसार यातील संघर्षाचे आणि द्वंद्वाचे वास्तव कठोर निरिक्षण सतीशच्या रूपाने दत्ता भगत दलित संघर्षाचे नोंदवतात

एक परंपरा सोडून दुसरी स्वीकारणे तसे मूळीच सोपे नसते. हजारो वर्षाचे संस्कार क्षणार्धात निमूटपणे काढता येत नाहीत. बुद्धीने स्वीकरले ते मनालाही सहजासहजी आत्मसात करणे शक्य होत नाही. खूप घालमेल व ओढाताण अशावेळी अपरिहार्य होते. कालपरवा पर्यंत अन्यायकारक परंपरा निमूटपणे सहन केल्या तेंव्हाची त्यांची मनसिकता काय होती? आणि आज हिंदूत्त्व नाकारल्यामुळे लाभलेल्या नव्या अस्मितेचा अंगीकार करत असताना या माणसांना कोणकोणत्या मानसिक प्रक्रियामधून, मानसिक द्वंद्वामधून, संघर्षामधून प्रवास करावा लागत आहे. याचा वेध दत्ता भगत हेमा आणि काका या व्यक्तिरेखाच्या मानसिकतेवर, त्यांच्या वर्तवणूकीतून दाखवून देतात. त्याचा सखोल व सहानुभूतीपूर्वक वेध घेण्याचा ते प्रयत्न करतात.

एकूणच चळवळ आणि तिची पडझड त्यामधून उध्वस्त होणारे संसार त्यातील संघर्षाचे आणि द्वंद्वाचे चित्रण प्रस्तुत नाटकात आलेले दिसते. एकंदरित, या नाटकातील

संघर्ष हा प्रत्येकाचा स्वत:शी, समाजव्यवस्थेशी, जातीयतेशी आणि मानवीमूल्याशी संघर्ष चालू आहे. भेदा-भेद, उच्च-नीच, भेद-भाव, कनिष्ठ-वरिष्ठ असा स्तर भेदाच्या जाणिवा संपुष्टात येऊन निखळ मानवी समाज अस्तित्वात यावा यासाठी भारतीय परंपरेत ज्या तत्त्वज्ञान आणि संघर्षाच्या परंपरा अस्तित्वात आल्या त्यात बुद्ध-फुले आंबेडकर या मानव मुक्तीच्या आंदोलनाची जी तत्त्वे आणि कृतीची संघर्षशील परंपरा रूढ केली आहे त्या परंपरेचाच धागा दत्ता भगत आपल्या 'वाटा-पळवाटा' नाटकाच्या कथावस्तुशी जोडतात.

### ❖ 'भाकरी आणि फूल' कादंबरीतील संघर्ष :

१९५६ च्या धम्मक्रांतीनंतर महाराष्ट्रात एक वादळी, विचार प्रवर्तक, परिवर्तनवादी साहित्याची लाट आली, 'दलित साहित्य' दलितांच्या व्यथा, वेदना, विद्रोह, नकार आणि स्विकाराने युक्त असे दलित साहित्य आहे. या दलित साहित्यातून दलितांच्या जीवन आणि जाणिवांना, दलित संवेदनेला जसे प्राधान्य लाभले. हे दलित जीवन चित्रण प्रत्यक्ष दलितांनी केले तसेच दलितेतरांनीही केले. हे करत असताना अखिल मानवतेला कवेत घेण्याचे सामर्थ्यही त्यात आहे. असे मधु मंगेश कर्णिकांच्या 'भाकरी आणि फूल' कादंबरीतील चित्रित झालेल्या संघर्षावरून दिसते.

शोषण करणाऱ्या धर्मव्यवस्थेला व सामाजिक व्यवस्थेला नकार देणे हा जसा दलित साहित्याचा पहिला आणि स्वाभाविक उच्चार असतो तसाच तो राजकीय व्यवस्थेलाही नाकारत असतो. स्वातंत्र्यानंतर पंचवीस वर्षामध्ये ही दलितांची स्थिती सुधारली नाही. पंचवीस वर्षानंतर ही गावाचा महारवाडा आहे तसाच आहे. व जर या दलित माणसाला स्वातंत्र्यानंतर काही मिळाले नाही तर देशालीही काही मिळाले नाही. या पार्श्वभूमीवर मधु मंगेश कर्णिक अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार समाजातील सुशिक्षित अशा गोपाळ, पांडुरंग व आनंदा या तरूणांनी मुंबई व आपल्या खेडेगावी चालविलेली दलित चळवळ, त्यांनी केलेला संघर्ष याचे चित्रण करतात. असा हा संघर्ष दलित व्यक्तिंना व्यक्तिसमुहांना तीन पातळ्यांवर एकाच वेळी लढावे लागते. दलित साहित्य या लढ्याचाच भाग म्हणून येत असते. एकंदरीत, पारंपरिक मानसिकते विरूद्ध वैचारिक संघर्ष येतो.

BAMR. ... LIBRARY

मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' कादंबरीचे आशयसूत्र पाहिल्यानंतर यातील संघर्षाचे स्वरूप आपल्या लक्षात येते. जगाच्या पाठीवर नसेल अशी एका वेगळ्या स्वरूपाची विषमता आपल्या देशात प्राचीन काळापासून आजही नांदते आहे. ही विषमता जातीय आणि वर्गीय स्वरूपाची आहे. या जाती-जमातीच्या कोंडवाड्यात इथली माणूसकी गुदमरून मरते आहे. जाती-पातीच्या उतरंडीत प्रत्येक माणूस अडकला असून जाती-जमातीचे कोंडवाडे इथे अजूनही जिवंत आहेत व अस्पृशताही टिकून आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून पंचविस वर्षे उलटली असली तरी कधी छुप्या पद्धतीने तर कधी उघडपणे जातीयता उफाळून वर येते. त्यामुळे जाती-जमातीच्या अस्पृश्यतेमध्ये इथला माणूस चिरडला जातो, तसाच भरडलाही जातो. हेच चिरडलेपण हेच भरडलेपण इथले 'दलित्व' आहे. दलितत्वाच्या या कोंडमाऱ्यातून सोडवणूक करण्यासाठी गोपाळ, पांडुरंग अणि आनंदा या तीन भावांनी केलेली चळवळ उभारलेला संघर्ष या कादंबरीत केंद्रवर्ती येतो.

कादंबरीत अगदी प्रथमपासून आबेडकरांच्या विचाराशी व चळवळींशी बांधील राहून त्या चळवळीच्या यशापयशाची चर्चा करत तीन पिढ्यांचा आंबेडकरी विचार आणि प्रत्यक्ष जीवन जगतानाचे ताण-तणाव हा मानसिक व शारीरिक संघर्ष हाच कादंबरीच्या आशयातून व्यक्त होतो. १९८२ साली प्रसिद्ध झालेल्या मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार समाजातील सुशिक्षित अशा गोपाळ, पांडुरंग आणि आनंदा या तरूणांनी मुंबई व आपल्या खेडेगावी चालविलेल्या दलित चळवळीचे चित्रण पहावयास मिळते. या दृष्टिने शहरात व कोकणातील खेडेगावात वास्तव्य करणाऱ्या दलितांच्या जीवनाचे चित्रण कर्णिक प्रामुख्याने करताना आढळतात. शिक्षणाचा अवलंब केल्यामुळे स्वावलंबीपणाने व स्वाभिमानाने जगू पाहणाऱ्या दलितांच्या जीवनाची कोंडी खेडेगावातील स्पृश्यवर्गीय कशी करतात? त्यांची अवहेलना कशी केली जाते? यातूनच संघर्षाला सुरूवात होते, बंडाची भाषा येते. याचे प्रत्ययकारी चित्रण सदर कादंबरीत झालेले आढळते.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीमध्ये एका अस्पृश्य कुटूंबाच्या स्थित्यंतराचा आढावा घेतात. त्यांनी केलेल्या संघर्षमय लढ्याचाही आढावा घेतात. त्यांच्या पात्रांच्या मनात विद्रोह आहे. कारण स्वातंत्र्यानंतर दलितांच्या मनात जे एक वैफल्य निर्माण झालेले

आहे. त्या समाज व्यवस्थेविरूद्ध त्यांच्या मनात विद्रोह निर्माण होतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने झपाटलेला परंतु परिस्थितीने कधी-कधी असह्य होऊन चडफडणारा आणि मग देशाविरूद्ध, धर्माविरूद्ध, धर्मग्रंथाविरूद्ध बंडाची भाषा बोलणारा गोपाळ आणि विद्रोह मनाचा अविष्कार असलेला आनंद त्यांचा संघर्ष ज्वलंतपणे मांडला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्यामुळे दलित समाज कसा भारावला होता, त्यांच्या विचाराचा सुशिक्षित दलित समाजावर प्रभाव संघर्षासाठी, लढण्यासाठी कसा कृतिप्रवण झाला हे आनंदाच्या व्यक्तिरेखेतून दिसून येते. समाजाच्या गतिशील परिवर्तनाचे, बदलत्याकाळाचे, काळानुसार बदलणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तीचे, आणि मूल्यव्यवस्थेची या मूल्य व्यवस्थेला नवशिक्षित दलितांनी केलेला विरोध, स्वातंत्र्याच्या प्रतिकाबद्दल दलित मनाला वाटणारी चीड हे विद्रोहाचे संघर्षमय घटनांचे सर्वकष चित्रण कर्णिक करताना दिसतात. या संघर्षातून एक 'सामाजिक वास्तव' या कादंबरीत उभे राहते. त्यामुळे कादंबरीतील संघर्ष अनेक केंद्री बनतो. कारण घटनांचा व काळाचा विशालपट घेऊन दलित व्यक्ती वा कुटुंबे समाजात कशी वावरतात, व्यक्ती-व्यक्ती मधील संबंधातून आणि समाज या तत्त्वाशी होत असणाऱ्या संघर्षातून माणसे कशी व्यवहार करीत असतात व आपल संपूर्ण आयुष्य कशा खडतर संघर्षाने जगत असतात याचे तपशीलवार चित्रण कर्णिक करताना दिसतात.

संघर्षापासून स्वत:ची सुटका करून घेणारे आपल्यापुरता पर्याय बघणारे ही काही दलित असतात. यामध्ये पांडुरंग या व्यक्तिरेखेचा प्रामुख्याने आपणास विचार करावा लागेल. दुभंगलेल्या दलित समाजाच्या अनेक व्यक्तिंची उदाहरणे मधु मंगेश कर्णिक या कादंबरीत देतात या लोकांनी पांढरपेशा जीवनपद्धती स्वीकारलेली असते. ॲडव्होकेट निलेकर, प्रा. सहदेव माने यांनी आपल्यापुरते कुटुंबवत्सल ब्राह्मणी जीवन स्वीकारलेले असते. आणि अशिक्षित तळागाळातल्या दलित समाजाची नाळ आपल्यापुरती तोडून टाकलेली असते. त्यांच्या सारखंच आखीव-बांधीव सुशिक्षित आयुष्य पांडुरंगाला जगायचे असते. सुनंदा आपल्यावर प्रेम करते तिच्या घरी गेल्यावर आपल्याला दलित म्हणून वागणूक मिळत नाही. या गोष्टीचे पांडुरंगाला फार अप्रुप वाटत असते. सुनंदा जेंव्हा एका गोऱ्या जातवाल्या अधिकाऱ्याबरोबर जेंव्हा लग्न करून जाते. तेंव्हा पांडुरंग हाताश होतो.

पांडुरंगला याचा जबरदस्त धक्का बसतो. येथेच आंतरजातीय विवाहामागचा सांस्कृतिक सामाजिक संघर्ष दिसतो.

गोपाळची पत्नी नलिनी पांडुरंगची वहिनी ही मुंबईतील प्रस्थापित दलित असते. नोकरी करणारी ही स्त्री पांडुरंगला सावरते. आपल्या मावस बहिणीशी त्याचे लग्न लावून देते. पांढरपेशा ब्राह्मण समाजातले लोक ज्या पद्धतीचे जीवन जगत असतात त्यापेक्षा चांगले स्वच्छ, टापटीपीचे आयुष्य पांडुरंग व्यतीत करू लागतो. आपल्यापुरती कोकणातल्या महारवाड्याची नाळ पांडुरंगने तोडून टाकलेली असते. महारवाड्यातून महानगरात येताच लोक बदलून जातात. त्या जीवनापासून संदर्भापासून त्यांना त्यांची मनापासूनची इच्छा असते त्याचे चित्रण कर्णिक नेमकेपणाने करतात. सांस्कृतिक संघर्षाची नोंद येथे दिसते.

एक परंपरा सोडून दुसरी स्वीकारणे तसे मुळीच सोपे नसते. हजारो वर्षाचे संस्कार क्षणार्धात निपटून काढता येत नाहीत. बुद्धीने स्वीकारले ते मनालाही सहजासहजी आत्मसात करणे शक्य होत नाही. खूप घालमेल व ओढाताण आशावेळी अपरिहार्य होते. लक्षावधींचा जो समुदाय दरवर्षी दीक्षाभूमीवर समृद्ध अंत:करणाने गोळा होतो त्याने कालपरवापर्यंत अन्यायकारक परंपरा निमूटपणे सहन केल्या त्याची मानसिकता काय होती? आणि आज हिंदूत्त्व नाकारल्यामुळे लाभलेल्या नव्या अस्मितेचा अंगीकार करीत असताना या माणसांना कोणकोणत्या मानसिक प्रक्रियांमधून प्रवास करावा लागत आहे? त्यांच्या मनातील अंतरर्विरोध मधु मंगेश कर्णिक नलिनी या पात्राधारे विशेषत्त्वाने मांडताना दिसतात की तिच्या मनातील मानसिक संघर्षाची नांदीच ठरते.

एकूणच 'भाकरी आणि फूल' कादंबरीच्या संघर्षाच्या केंद्रस्थानी चळवळ आणि जातीयता हे दोन घटक आहेत. अपरिपक्व आंबेडकरी विचारांच्या मार्गामुळे आणि मार्गदर्शनाच्या आभावामुळे चळवळीची आणि पर्यायाने दलित समाजाची कशी पडझड होते. अशा आशयाच्या संघर्षावर ही कलाकृती आधारित आहे. चळवळ आणि तिची पडझड त्यामधून उध्वस्त होणारे संसार यामधील संघर्षाचे आणि द्वंद्वाचे चित्रण या कलाकृतीतून दिसून येते. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील संघर्ष हा स्वातंत्र्योत्तर काळामध्ये दलित समाजाला झालेला भ्रमनिराश व त्यामुळे त्यांच्या वाट्याला आलेली सामाजिक परिस्थिती

यावर अधिक भर देते. या कादंबरीतील संघर्ष हा देशाला स्वातंत्र्य मिळाले असूनही आपल्या स्वतंत्र देशात अस्पृश्यांचा छळ, अस्पृश्यता पाळणे, वेगळ लेखणं, विकास उद्धारापासून, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक सत्ता कारणापासून दूर ठेवणं या विरोधात या कादंबरीतील संघर्ष आहे. यासाठीच गोपाळ व पांडुरंग हे आनंदाच्या अंकुराला जोपासण्याचा वाढवण्याचा प्रयत्न करतात कारण येथून पुढच्या संघर्ष पर्वाची सुरूवात आहे. कर्णिक हे व्यक्ति-व्यक्ति संघर्ष, दलित-सवर्ण संघर्ष, दलित-दलित संघर्ष तसे अंतर्मनातील संघर्षही आपल्या या आशय विषयातून उभा करतात.

### ❖ 'वाटा-पळवाटा' नाटक व 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील संघर्ष साम्य आणि भेद :

दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' (नाटक) आणि मधु मंगेश कर्णिक 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) यांचा आशयविषयामध्ये बऱ्याच प्रमाणात साम्य आहे, हे आपण दुसऱ्या प्रकरणामध्ये सविस्तर पाहिले आहे. त्याचबरोबर तिसऱ्या प्रकरणामध्ये दोन्ही कलाकृतीतील व्यक्तिरेखांच्या साम्य-भेदांचा विचार केला आहे. समान आशयावरती आधारलेल्या कलाकृती आणि त्यातील व्यक्तिरेखांमध्ये जर साम्य असेल तर त्या कलाकृतीमध्ये येणाऱ्या संघर्षामध्ये कोणते साम्य-भेद येतात याचा विचार करावयाचा आहे.

या दोन्ही कलाकृतीमध्ये येणाऱ्या संघर्षाचा विचार करता यावरती फॉर्मचा म्हणूनही काही प्रभाव जाणवतो. दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' नाटकामध्ये दलित समाजातील पूरग्रस्तांना घरे मिळवून देण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील तीन पिढ्यांतील व्यक्तिरेखांचा मानसिक शारिरिक पातळीवरील संघर्ष यांचे चित्रण केलेले आहे. उदाहरणार्थ सतीश ही दुसऱ्या पिढीतील विचारी व्यक्तिमत्त्व आहे. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान त्याने काळजीपूर्वक अभ्यासले आहे शिवाय ही व्यक्तिरेखा आंबेडकर सहकालीन आणि आंबेडकरोत्तर अशा दोन पिढ्यांना जोडणारा दुवा आहे. पहिल्या पिढीत अधिक भावूकता आहे. तिसऱ्या पिढीत अविचारीपणा आहे. अशा या भावना आणि अविचारी संघर्षामध्ये दुसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या विचारी अशा सतीशच्या मनातील मानसिक आंदोलने नाटककारानी टिपलेले आहे. पहिल्या पिढीची टोकाची भावनिक निष्ठा आणि तिसऱ्या पिढीची अविचारी

कृती त्यातून उभे राहणारे आंदोलने, केला जाणारा अनैतिक व्यवहार ते पाहून सतीश हतबल होतो. हे या नाटकातील संघर्षाचे मध्यवर्ती सूत्र आहे

तसेच 'भाकरी आणि फूल' या कादंबरीमध्ये पांडुरंग ही दुसऱ्या पिढीतील विचारी व्यक्तिमत्त्व आहे. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान त्याने काळजीपूर्वक अभ्यासले आहे. शिवाय ही व्यक्तिरेखा आंबेडकर समकालीन आणि आंबेडकरोत्तर अशा दोन पिढ्यांना जोडणारा दुवा आहे. दुसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या पांडुरंगच्या मनातील मानसिक आंदोलने मधु मंगेश कर्णिक यांनी चित्रित केले आहे. मात्र 'वाटा-पळवाटा' या नाटकातील तिसरी पिढी जशी अविचारी अनैतिक आहे तशी 'भाकरी आणि फूल' मधील तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्त्व करणारा आनंद ही व्यक्तिरेखा नाही हे जरी खरे असले तरी ही आक्रमतेचा अवलंब करणारी आहे.

या दोन्ही कलाकृतीचे मूळ आशयसूत्र एकच असले तरी आशयद्रव्याचे घटक आणि त्यांची संघटना यातील भिन्नतेमुळे संघर्ष हा कादंबरी, नाटक रूपबंधाच्या दृष्टिने ते वेगवेगळ्या पातळ्यांवर आकारात येतो. 'वाटा-पळवाटा' नाटकात संघर्ष रूपाने 'नाट्य' उभारण्याचा (दिगदर्शनाचा) प्रयत्न तर 'भाकरी आणि फूल' कादंबरीत संघर्षामधून वस्तुस्थिती दर्शन (कथन) हे अभिव्यक्तीचे दर्शन घडते. त्यामुळे नाटकाचा काळ आणि अवकाश कादंबरीच्या तुलनेत कमी असल्याने नाटकामध्ये येणारे घटना, प्रसंग, संघर्ष हा तिव्र स्वरूपाचा व जास्त परिणामकारक वाटतो. कारण यातूनच नाटककाराला 'नाट्य' उभे करायचे असते. आणि संघर्षातूनच खरे 'नाट्य' प्रेक्षकापुढे उभे राहते कादंबरी आशय आणि विषय काळ व अवकाशाच्या दृष्टिने विस्तृत पट आपल्या कवेत घेत असल्याने कादंबरीत येणाऱ्या संघर्षाचे विविध पैलू सर्व आयामाशी येतो. याची प्रचीती दोन्ही कलाकृतीतील संघर्षावर दृष्टिक्षेप टाकल्यास आपल्या लक्षात येते.

'वाटा-पळवाटा' व 'भाकरी आणि फूल' या दोन्ही कलाकृतीमध्ये तीन पिढ्यांचे चित्रण लेखक दत्ता भगत आणि मधु मंगेश कर्णिक यांनी केले आहे. या दोन्ही कलाकृतीमधील पहिली पिढी ही अत्यंत प्रामाणिक, प्राजंळ अशी असून बुद्ध तत्त्वज्ञान व आंबेडकरी तत्त्वज्ञान याचे फारसे आकलन नसलेली अशी आहे. डॉ. बाबासाहेब यांच्या विचारावर निष्ठा असणारी असून देशाविरूद्ध, धर्मग्रंथाविरूद्ध, धर्माविरूद्ध बंडाची भाषा

बोलणारी किंवा विद्रोह करणारी आहे. तसेच धर्मभावना व अंधश्रध्देमध्ये थोडीशी गुरफटलेली दिसून येते. यावरून ही पिढी आंबेडकरी विचाराने थोडीशी अपरिपक्व असल्याचे जाणवते. त्याचप्रमाणे आधुनिकतेचा विचार स्वीकारून सुद्धा पारंपरिक विचारामध्ये गुरफटताना दिसते. त्यामुळे तिने केलेल्या किंवा दिलेल्या संघर्षामध्ये एक प्रकारची आगतिकता दिसते.

दुसरी पिढी ही अत्यंत संयमशील स्वत: व डॉ. आंबेडकरांच्या विचाराशी प्रामाणिक अशी आहे. दलित चळवळीच्या संदर्भात तटस्थपणे भूमिका मांडणारी असली तरी सार्वजनिक जीवनामध्ये प्रत्यक्ष संघर्ष आणि कृती करीत नाही असं असले तरी सुद्धा 'वाटा-पळवाटा' तील ही दुसरी पिढी ज्या मानसिक संघर्षामध्ये गुरफटलेली आहे. त्या स्वरूपाच्या संघर्षातून 'भाकरी आणि फूल' मधील दुसरी पिढी ही थोडीशी बाहेर पडलेली आहे.

'वाटा-पळवाटा' मधील व 'भाकरी आणि फूल' मधील तिसरी पिढी ही अत्यंत महत्त्वाची अशी आहे. अनेक वर्षे अन्याय सोसलेली, अनेक वर्षे आशेवर जगून शेवटी निराशाच पदरी पडलेली अस्पृश्यता निर्मूलन कायद्याने झाले तरी व्यवहारात जाती-जमातींचे जाचक बंध अनुभवलेली याचेच परिणाम म्हणून वेदान-विद्रोह व नकार यांना जन्म देणारी अशी ही तिसरी पिढी आहे. या दोन्ही कलाकृतीतील तिसऱ्या पिढीतील व्यक्तिरेखा समान पातळीवर वावरत असल्या तरी वैचारिक दृष्टिने व संघर्षशील कृतीने यांच्यामध्ये भेद असलेला दिसून येतो. 'भाकरी आणि फूल' मधील तिसऱ्या पिढीपेक्षा 'वाटा-पळवाटा'मधील तिसरी पिढी व तिने दिलेला संघर्ष अत्यंत प्रभावशाली दिसून येतो.

'वाटा-पळवाटा' व 'भाकरी आणि फूल' या कलाकृतमधील संघर्षाचाविचार करत असताना आपल्या लक्षात येते की या दोन्ही कलाकृतीमधील संघर्ष हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. या संघर्षाच्या केंद्रस्थानी चळवळ आणि जातियता हे दोन घटक आहेत. अपरिपक्व आंबेडकरी विचारांच्या मार्गामुळे आणि मार्गदर्शनाच्या आभावामुळे चळवळीची आणि पर्यायाने समाजाची कशी पडझड होते. अशा आशयाच्या संघर्षावरती या दोन्ही कलाकृती आधारीत आहेत. चळवळ आणि तिची पडझड व त्यामधून उध्वस्त होणार संसार यामधील संघर्षाचे आणि द्वंद्वाचे चित्रण या दोन्ही कलाकृतीमधून झालेले दिसून येते.

'भाकरी आणि फूल' कादंबरीतील संघर्ष हा देशाला स्वातंत्र्य मिळूनही आपल्या स्वतंत्र देशात अस्पृश्यांचा छळ, अस्पृश्यता पाळणं, हरिजनांना वेगळ लेखण या सर्वांच्या विरोधात 'भाकरी आणि फूल' कादंबरीमधील संघर्ष आहे.

'वाटा-पळवाटा' नाटकात दलितांच्या तीन पिढ्यांतील संघर्ष आहे. तो वैचारिक, तत्त्वनिष्ठ स्वरूपाचा संघर्ष आहे. या नाटकातील काका आंबेडकरी चळवळीत प्रत्यक्ष काम केलेले आहेत. ते जुन्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. प्राध्यापक सतीश हा स्वातंत्र्योत्तर काळात शिकलेला, नोकरित स्थिर झालेला, चळवळीशी संबंधीत असलेला, प्रत्येक प्रसंगाचा गांभीर्याने विचार करणारा आहे. अर्जुन हा आपल्या ध्येयाजवळ तडक जाणारा परिणामांची पर्वा न करणारा तत्त्वनिष्ठेला जास्त महत्त्व देणारा अशा तीन पिढ्यांतील संघर्ष या नाटकांत जाणवतो. नाटकातील संघर्षामुळे 'नाट्य' निर्मितीच्या परिणामकारकता वाढते. याबाबतीत वि. पा. दांडेकरांचे मत विचारात घेण्यासारखे आहे, "संघर्ष हा ललित वाङ्मयाच्या आत्मा आहे. असे प्रा. ना. सी. फडके यांनी 'प्रतिभा-साधना' ग्रंथात प्रकट केलेले मत पूर्ण सत्य आहे. संग्राम-झगडा-लढा हा नाटकाचा प्राण आहे."[3] संघर्ष जर नाटकाचा प्राण असेल तर किती महत्त्वाचा घटक आहे हे आपल्या लक्षात येते. आणि दत्ता भगत यांनी संघर्षरूपाने 'वाटा-पळवाटा' नाटकात चांगलाच प्राण भरलेला आहे.

एक परंपरा सोडून दुसरी परंपरा स्वीकारणे तसे मुळीच सोपे नसते. हजारो वर्षाचे संस्कार क्षणार्धात निमूटपणे काढता येत नाहीत. बुद्धीने स्वीकारले ते मनालाही सहजा-सहजी आत्मसात करणे शक्य होत नाही. खूप घालमेल व ओढाताण आशावेळी होते. अंर्तमनातील संघर्षाची ही रूपे स्त्री व्यक्तिरेखाच्या हेमा आणि नलिनीच्या रूपाने कर्णिक व भगत करताना दिसतात. याही बाबतीत दोन्ही कलाकृतीतील संघर्षात साम्य दिसून येते.

दोन्ही साहित्यकृतीतील दलितांनी केलेला संघर्ष पाहिल्यनंतर आपल्याला आणखी एक गोष्ट लक्षात येते की, दलितांनी कितीही संघर्ष केला तरी त्यांना जगणे सुद्धा फार महत्त्वाचे वाटते. पोटासाठी ते लाचार बनताना दिसतात. आपली अस्मिता जागी ठेवून संघर्ष करणारे दलित प्रसंगी तडजोड करताना दिसतात. हे दोन्ही कलाकृतीतून कमी-अधिक प्रमाणात चित्रित झालेले दिसून येते. या दोन्ही साहित्यकृतीतील संघर्ष हा विविध प्रवृत्तींच्या व्यक्तिंच्या माध्यमातून हा संघर्ष साकार झाला आहे. त्यात जाती श्रेष्ठत्व-

कनिष्ठत्त्व, ब्राह्मण्य-पुराणमतवाद, लाचारी, दारिद्रय इ. प्रवृत्तीचा झडणारा संघर्ष या दोन्ही कलाकृतीत येतो.

### ❖ समारोप :

दत्ता भगत आणि मधु मंगेश कर्णिक यांच्या 'वाटा-पळवाटा' व 'भाकरी आणि फूल' या साहित्यकृतीतील संघर्ष चित्रणामध्ये एक समान धागा दिसून येतो तो म्हणजे भेदा-भेद, उच्चनिच, भेद-भाव, कनिष्ठ-वरिष्ठ अशा स्तरभेदाच्या जाणिवा संपुष्टात येऊन निखळ मानवी समाज अस्तित्वात यावा यासाठी भारतीय परंपरेत ज्या तत्त्वज्ञान आणि संघर्षाच्या परंपरा अस्तित्त्वात आल्या त्यात बुद्ध-फुले-आंबेडकर या मानवमुक्तीच्या आंदोलकांनी जी तत्त्व आणि कृतीची संघर्षशील परंपरा रूढ केली आहे त्या संघर्षाच्या परंपरेचाच धागा भगत आणि कर्णिक आपल्या कथावस्तुला जोडतात.

दत्ता भगत आणि कर्णिक यांच्या ह्या दोन्हीही कलाकृतीमध्ये साम्य स्थळे विशेषत्त्वाने जाणवतात. आशय, व्यक्तिरेखा आणि संघर्ष या तीन्हींच्याबाबतीत घटना-प्रसंग आणि व्यक्तिरेखांची नावे सोडली तर या दोन्ही कलाकृतीत सार्धम्यच प्रत्ययास येते. त्यामुळे एका कथाबीजाने साकारलेल्या ह्या दोन कलाकृतीतून निर्मितीच्या अंगाने विचार करता या दोन्हीही कलाकृती स्वंयपूर्ण असल्याचा निर्वळा दोन्ही कलावंताचा असणे शक्य आहे. विशेषत: 'भाकरी आणि फूल' ही प्रारंभीची (१९८२) निर्मिती आहे. तर 'वाटा-पळवाटा' (१९८८) ही सहा वर्षानंतरची निर्मिती आहे. सामाजिक आणि वाङ्मयीन पर्यावरणाची जाण असणारे दोन्हीही कलावंत आहेत. त्यामुळे वाङ्मय इतिहासाच्या टप्प्यावर या दोन्ही कलाकृतीचा अपघात घडला आणि हा अपघात किंवा या अपघातापासून दोन्ही कलावंत अनभिज्ञ आहेत असे म्हणने धारिष्ट्याचे होईल. समान आशयसूत्र म्हणून या कलाकृती जशा महत्त्वाचा आहेत. तसा भेद दोन्हीमध्ये भेद मात्र विशेषत्त्वाने जाणवत नाही. असे असले तरीही मराठी साहित्याच्या प्रांतात या दोन्ही कलाकृतीचा स्वतंत्र मान्यता मिळालेली आहे.

### ❖ निष्कर्ष :

१. संघर्ष हा नाटकाचा आत्मा असतो दत्ता भगतांच्या या नाटकात सर्वत्र संघर्ष दिसून येतो. हा संघर्ष वेगवेगळ्या पातळ्यांवरून साकार होतो. हा संघर्ष सामाजिकता, व्यक्तिगत आणि मानसिक पातळ्यांपर्यंत निर्माण करून दत्ता भगत नाटकाच्या आशयाची (कथानकाची) परिणामकारकता वाढवतात.

२. दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' नाटकात चळवळ आणि तिची पडझड, त्यातून उध्वस्त होणारे संसार, यातील संघर्षाचे आणि द्वंद्वाचे चित्रण प्रस्तुत नाटकात आलेले दिसते. या नाटकातील संघर्ष हा प्रत्येकाचा स्वत:शी, समाजव्यवस्थेशी, जातियतेशी आणि मानवीमूल्यांशी चालू आहे. निखळ, मानवी समाज अस्तित्वात यावा यासाठी भारतीय परंपरेत ज्या तत्त्वज्ञान आणि संघर्षाच्या परंपरा अस्तित्त्वात आल्या त्यात बुद्ध-फुले-आंबेडकर या मानवमुक्तीच्या आंदोलनाची जी तत्त्वे आणि कृतीची संघर्षशील परंपरा रूढ केली आहे त्या परंपरेचा धागा दत्ता भगत आपल्या 'वाटा-पळवाटा' नाटकाच्या कथावस्तुशी जोडतात.

३. समाजाच्या गतिशील परिवर्तनाचे बदलत्या काळाचे काळानुसार बदलणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींचे आणि मूल्य व्यवस्थेची, या मूल्याव्यवस्थेला नवशिक्षित दलितांनी केलेला विरोध, स्वातंत्र्याच्या प्रतिकाबद्दल दलित मनाला वाटणारी चीड हे विद्रोहाचे, संघर्षमय घटनांचे सर्वकष चित्रण कर्णिक 'भाकरी आणि फूल' या कादंबरीत करताना दिसतात. या संघर्षातून एक 'सामाजिक वास्तव' या कादंबरीत उभे राहते. त्यामुळे कादंबरीतील संघर्ष अनेककेंद्री बनतो.

४. 'भाकरी आणि फूल' या कादंबरीतील संघर्ष हा देशाला स्वातंत्र्य मिळाल असूनही आपल्या स्वतंत्र देशात अस्पृश्यांचा छळ, अस्पृश्यता पाळणं, वेगळ लेखन, विकास उद्धारापासून, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, सत्ताकारणांपासून दूर ठेवणं या विरोधात या कादंबरीतील संघर्ष आहे. यासाठीच गोपाळ व पांडुरंग हे आनंदांच्या अंकुराला जोपासण्याचा वाढवण्याचा प्रयत्न करतात. कारण येथून पुढच्या संघर्ष पर्वाची सुरूवात आहे. कर्णिक हे व्यक्ति-व्यक्ति मधील संघर्ष, दलित-सवर्ण संघर्ष,

दलित-दलित संघर्ष तसेच अंतर्मनातील संघर्षही आपल्या या आशय-विषयातून उभा करतात.

५. विशेषत: अपरिपक्व आंबेडकरी विचारांच्या मागामुळे आणि मार्गदर्शनाच्या आभावामुळे चळवळीचे आणि पर्यायाने समाजाची कशी पडझड होते अशा प्रकारचा आशय दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' (नाटक) आणि मधु मंगेश कर्णिक यांच्या 'भाकरी आणि फूल' (कादंबरी) मधून या स्वरूपाच्या आशयाच्या संघर्षावरती या दोन्ही कलाकृती आहेत.

६. समाज परिवर्तनासाठी झपाटलेल्या व्यक्तिरेखा आणि त्यांनी उभारलेला संघर्ष दत्ता भगत व मधु मंगेश कर्णिक आपल्या कलाकृतीच्या आशय-विषयातून उभा करतात.

७. दोन्ही कलाकृतीचे मूळ आशयसूत्र एकच असले तरी आशयद्रव्याचे घटक आणि त्यांची संघटना यातील भिन्नतेमुळे संघर्ष हा कादंबरी व नाटक रूपबंधाच्या दृष्टिने तो वेगवेगळ्या पातळ्यांवर आकारात येतो.

८. नाटकाचा काळ आणि अवकाश कादंबरीच्या तुलनेत कमी असल्याने नाटकामध्ये येणारे घटना-प्रसंग, संघर्ष हा तिव्र स्वरूपाचा व जास्त परिणामकारक वाटतो. कारण यातूनच नाटककाराला नाट्य उभे करायचे असते आणि संघर्षातून खरे नाट्य प्रेक्षकापुढे उभे राहते. कादंबरी आशय आणि विषय, काळ व अवकाशाच्या दृष्टिने विस्तृत पट आपल्या कवेत घेत असल्याने कादंबरीत येणाऱ्या संघर्षाचे विविध पैलू सर्व आयामाशी येतो. याची प्रचीती दोन्ही कलाकृतीतील संघर्षावर दृष्टिक्षेप टाकल्यास आपल्या लक्षात येते.

---- ❖ ❖ ❖ ----

## ❖ संदर्भ सूची :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. पानतावणे गंगाधर | : | 'साहित्य:प्रकृती आणि प्रवृत्ती' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. ऑगष्ट-१९९९, पृ. क्र. १३. |
| २. | डॉ. किरवले कृष्णा | : | 'दलित चळवळ आणि साहित्य' प्रतिभा प्रकाशन, द्वि. आ २००६, पृ. क्र.२. |
| ३. | भगत दत्ता | : | 'वाटा-पळवाटा' प्रकाशक - अ. अ. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०, प्र. आ. १९८८. |
| ४. | प्रा. दांडेकर वि. पा. | : | 'मराठी नाट्यसृष्टी-सामाजिक नाटके' बडोदा, प्र. आ. १९५७, पृ.क्र. २. |